# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## अखिल भारतीय समन्वयीत सोयाबीन संशोधन प्रकल्प

सोया. शे.मे./ /२०१७
दि.०२/०५/२०१७

**<u>जाहीर प्रगटन</u>**

**विषयः- वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दि. १८ मे २०१७ रोजी आयोजित शेतकरी मेळावा व कृषि प्रदर्शनानिमित्य शेतकऱ्यांना दुपारचे भोजन देणे बाबत...**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दि. १८ मे २०१७ रोजी कृषि विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्य भव्य शेतकरी मेळावा व कृषि प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. सदरील शेतकरी मेळाव्यात अंदाजित ५००० शेतकऱ्यांना दुपारचे भोजन देणे प्रस्तावीत आहे.

सदरील मेळाव्यात दुपारच्या भोजनामध्ये शेतकऱ्यांना पोटभर- मसाला खिचडी, कडी, बालुशाही व मिनरल पाणी दयावयाचे आहे.

तरी वरील विवरणानुसार दुपारचे भोजनाचा पुरवठा करू इच्छीणाऱ्या कंत्राटदारांनी सोबत जोडलेल्या अटी आणि शर्तीचे वाचन करून, **अध्यक्ष, भोजन समिती तथा प्रभारी अधिकारी सोयाबीन संशोधन प्रकल्प, वनामकृवि, परभणी** यांच्याकडे सोबत जोडलेल्या दरपत्रक, हमीपत्र नमुनाप्रमाणे भरलेल्या लिफाफेबंद, अटी व शर्ती सहीत दि. ११/०५/२०१७ सकाळी १२ वाजेपर्यंत सादर करावेत. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी.

**अध्यक्ष**
भोजन समिती तथा प्रभारी अधिकारी
अ.भा.स.सोयाबीन संशोधन प्रकल्प
वनामकृवि, परभणी

प्रत:

१. नोटीस बोर्ड प्रशासकीय इमारत वनामकृवि, परभणी
२. नोटीस बोर्ड अ.भा.स.सोयाबीन संशोधन प्रकल्प, वनामकृवि, परभणी
३. नोटीस बोर्ड विस्तार शिक्षण संचालनालय, वनामकृवि, परभणी
४. नोटीस बोर्ड, महानगरपालिका, परभणी
५. नोटीस बोर्ड, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

# शेतकरी मेळावा १८ मे २०१७

## दरपत्रकाच्या अटी व शर्ती

१. अनामत रक्कम रू. ५०००/-(अक्षरी रू. पाच हजार केवळ) चा राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफ्ट **नियंत्रक, वनामकृवि, परभणी** यांचे नावे देण्यात यावा, तो न जोडल्यास निविदा स्विकारली जाणार नाही.

२. भोजन हे उत्कृष्ठ तांदळापासून तयार करणे अनिवार्य आहे तसेच भोजन निर्मितीकरीता वापरण्यात येणारे साहित्य (भांडी) स्वच्ध असावी.

३. उपरोक्त भोजनाचे सेवन केल्यास आरोग्यास कुठलाही धोका होणार नाही याची पदार्थ तयार करतेवेळी काळजी घ्यावी. आरोग्यास हानी पोहचल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहिल.

४. सुयोग्य सेवा मिळण्यासाठी भोजन बफे पध्दतीने वाटप करण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. तसेच ५००० व्यक्तीस वाटप करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सेवकांची नियुक्ती कंत्राटदारास करावी लागेल. सदर सेवक हे विनम्र सेवा देणारे असावेत तसेच सेवक स्वच्छ गणवेशात असणे आवश्यक आहे.

५. बफे पध्दतीने भोजन वाटप करण्यासाठी आवश्यक असणारे साहित्य उदा.प्लेट,ग्लास, वाटी इ.कंत्राटदारांनी पुरविणे आवश्यक आहे.

६. ज्या कंत्राटदाराचे अथवा प्रतिष्ठानाने अशा किंवा या पेक्षा मोठया जेवणाचे शासकीय कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडले असतील त्यांनी त्याचे अनुभव प्रमाणपत्र द्यावे आणि अशाच कंत्राटदाराचे दरपत्रक स्विकारण्यात येतील.

७. भोजन निर्देशित केलेल्या वेळेत, ठिकाणी पोचविण्याची व वाटपाची जबाबदारी कंत्राटदारावर राहिल.

८. भोजन प्रमाणबध्द तिखटामध्ये तसेच उच्चप्रतिच्या डबल फिल्टर सुर्यफुल तेलात आणि बालूशाही उच्चप्रतिच्या वनस्पती तुपात करणे आवश्यक आहे.

९. कंत्राटदारास कुठल्याही प्रकारचा अग्रीम मिळणार नाही.

१०. कंत्राटदाराच्या त्याच्या देयकाची अदायगी धनादेशाद्वारे करण्यात येईल. त्यासाठी त्यांचे प्रतिष्ठानाच्या नावे बँकेत खाते असणे आवश्यक आहे. वैयक्तीक व्यक्तीच्या नावे धनादेश देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

११. कंत्राटदारास कामगार कायद्याचे सर्व नियम पाळणे आवश्यक आहे.

१२. नियमाप्रमाणे सेवा कर इ. कर भरण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१३. दरपत्रक उघडणे बाबतच्या तारखेत बदल करण्याचे स्वातंत्र्य विद्यापीठास राहील.

१४. दरपत्रधारकास दरपत्रक उघडण्याचे वेळी भोजनाचा नमुना तपासणी करता देणे बंधनकारक आहे.

१५. दरपत्रक संबंधी काही वाद निर्माण झाल्यास परभणी न्यायालयांतर्गत अधिन राहून सोडविण्यात येईल.

१६. दरपत्रक मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

१७. नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी विद्यापीठावर राहणार नाही.

१८. यशस्वी दरपत्रधारकास सुरक्षा ठेव अनामत रक्कम व्यतिरिक्त म्हणून रू. १०,०००/- (अक्षरी रू- दहा हजार केवळ) राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष/डिडि **नियंत्रक, वनामकृवि, परभणी** यांचे नावे जमा करावा लागेल.

१९. निविदा दोन पाकीट मध्ये दयाव्यात.पॉकीट क्रमांक १ मध्ये खालील कागदपत्रे सादर करावीत.

अ. इसारा रक्कम (इएमडी) रू. ५०००/- रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनादेश/डिडि

ब. खालील प्रमाणपत्राच्या सत्यप्रती आवश्यक

१. शॉप ॲक्टप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र

२. आयकर पॅनकार्ड किंवा आयकर निपटारा प्रमाणपत्र

३. अन्न व औषधी विभाग महाराष्ट शासन यांचे खाद्यविक्रेते प्रमाणपत्र

४. व्यावसायिक कर नोंदणी प्रमाणपत्र

५. सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र

६. मुल्यवर्धित कर (व्हॅट) नोंदणी प्रमाणपत्र

७. अनुभव प्रमाणपत्र

क. पॉकीट क्र. २ वर पॉकीट क्र. २असे लिहून त्यावर भोजन दरपत्रक असे स्पष्ट नमुद करावे व त्यात भरलेले दरपत्रक व हमीपत्र असावे. निविदाधारकाने दर आवश्यक त्या ठिकाणी आकडयात व अक्षरी लिहावे.

ड. पॉकीट क्र. १ व २ हे एका मोठया पॉकीटात घालून मोहरबंद करून **"खरीप शेतकरी मेळावा १८ मे २०१७ साठी भोजन निविदा"** असे स्पष्ट लिहून कंत्राटदाराचे नाव व सही सहित निविदा दि. ११/०५/२०१७ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत सादर करावी.त्याच दिवशी दुपारी ४ वाजता **संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी** यांच्या कार्यालयात निविदा उघडल्या जातील.

२०. भोजनाचा समाधानकारक पुरवठा केल्यावरच देयकाची अदायगी करण्यात येईल.

**अध्यक्ष**
**भोजन समिती तथा**
**प्रभारी अधिकारी,**
**सोयाबीन संशोधन प्रकल्प**
**वनामकृवि, परभणी**

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## खरीप शेतकरी मेळावा, १८ मे २०१७
## शेतकऱ्यांना दुपारचे भोजन पुरवठा दरपत्रक

| अ.क्र | दिनांक | दुपारच्या भोजनाची संख्या | दुपारच्या भोजनाचा तपशील | प्रति ताट भोजन दर (रू.) |
|---|---|---|---|---|
| १ | १८ मे २०१७ | ५००० | शेतकऱ्यांना पोटभर- मसाला खिचडी, कडी, बालुशाही व मिनरल पाणी पुरविणे. | |

दरपत्रकधाराकाची स्वाक्षरी

नाव व पत्ता

दुरध्वनी क्रमांक

# <u>हमी पत्र</u>

मी/आम्ही अशी हमी देतो की, दरपत्रकातील अटी व शर्ती पुर्णपणे वाचल्या असून मला/आम्हाला मान्य आहेत.

स्वाक्षरी

नाव

फोन क्र.

भ्र.ध्वनी क्र.

ठिकाण:-

दिनांक:-